# ಕರ್ನಾಟಕ ಶಾಲಾ ಪರೀಕ್ಷೆ ಮತ್ತು ಮೌಲ್ಯನಿರ್ಣಯ ಮಂಡಲಿ
**ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು – 560 003**

**KARNATAKA SCHOOL EXAMINATION AND ASSESSMENT BOARD**
**Malleshwaram, Bengaluru – 560 003**

## 2023-24ರ ಎಸ್.ಎಸ್.ಎಲ್.ಸಿ. ಮಾದರಿ ಪ್ರಶ್ನೆಪತ್ರಿಕೆ
## S.S.L.C. MODEL QUESTION PAPER – 2023-24

## ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ
**Subject : First Language — MARATHI**

ಸಮಯ : 3 ಗಂಟೆ 15 ನಿಮಿಷಗಳು ] **ವಿಷಯ ಸಂಕೇತ : 08-M**

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : **100** ] **Subject Code : 08-M**

**CCE-RF : ಶಾಲಾ ವಿದ್ಯಾರ್ಥಿಗಳು / Regular Fresh**

---

**विद्यार्थ्यांना सामान्य सूचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये 45 प्रश्न आहेत.
2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परीक्षा सुरु झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.
3. प्रश्नांसाठी दिलेल्या सूचनांचे पालन करा.
4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.
5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

[ Turn over

**I. पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा : 6 × 1 = 6**

1. 'नभोवाणी' या शब्दाचा संधी विग्रह असा होतो –

(अ) नभ + वाणी (ब) नभो + वाणी

(क) नभा + वाणी (ड) नभः + वाणी

2. माझे बाबा काल <u>पुण्याहून</u> आले. अधोरेखित शब्दाची विभक्ती लिहा –

(अ) द्वितीया (ब) संबोधन

(क) पंचमी (ड) षष्ठी

3. ''गावकऱ्यांनी चोर पकडला.'' या वाक्यातील प्रयोग ओळखा –

(अ) कर्तरी (ब) कर्मणी

(क) भावे (ड) सकर्मक भावे

4. ''मी काम करत जाईन.'' हे या काळाचे उदाहरण आहे –

(अ) वर्तमान काळ (ब) भूतकाळ

(क) भविष्य काळ (ड) रिती भूतकाळ

5. ''डोळ्यात केर कानात फुंकर'' या आशयाशी साधर्म्य साधणारी म्हण .... –

(अ) आग रामेश्वरी बंब सोमेश्वरी (ब) शितावरून भाताची परीक्षा

(क) नावडतीचे मीठ आळणी (ड) गाढवाला गुळाची चव काय

6. 'पीतांबर' हे या समासाचे उदाहरण आहे –

(अ) द्विगु (ब) द्वंद्व

(क) मध्यमपदलोपी (ड) कर्मधारय

**II. पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा :**

**4 × 1 = 4**

7. धान्य ठेवण्याची वेताची उंच टोपली : कणगी : : बारा वर्षाचा कालावधी : ..............

8. बापरे : केवल प्रयोगी अव्यय : : आणि : ..............

9. पार : कट्टा : : ओसरी : ..............

10. काळा : गोरा : : उत्तीर्ण : ..............

**III. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :** **7 × 1 = 7**

11. 'वसईचा वेढा' या पाठाचा साहित्य प्रकार कोणता ?

12. खंडोजी माणकरने कोणते कार्य पत्करले ?

13. अनंत काणेकर लिखित 'मनाचे पिंजरे' या पाठाचे मूल्य लिहा.

14. पावसाने झोडपल्यावर गुराखी कोठे उभा राहतो ?

15. भर दुपारी कोणाची रांग लागते ?

16. गायी कोण हाकतो आहे ?

17. चुलीतल्या लाकडाने कुठे जळावे ?

**IV. खालील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा :** **3 × 2 = 6**

18. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा :

(अ) जिव्हारी झोंबणे

(ब) राम राम ठोकणे.

19. अलंकार ओळखून लक्षणे लिहा :

चाफा बोलेना, चाफा चालेना

चाफा खंत करी, काही केल्या फुलेना.

20. गण पाडून वृत्त ओळखा.

मेघांनी हे गगन भरता गाढ आषाढमासी.

[ Turn over

**V. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा : 7 × 2 = 14**

21. 'अनंतशक्तीः परमेश्वरू' या कथेचे तात्पर्य सांगा.

22. 'अनंत काणेकर' यांचा परिचय लिहा.

23. ''राजकन्येचा दिमाख त्यांच्या वागण्या बोलण्यात दिसत नव्हता'' – ससंदर्भ स्पष्ट करा.

24. वाटणीच्या घोळाने घरात काय घडत होते ?

25. शिशुपालाच्या रक्षणासाठी कोण-कोण आले आहेत ?

26. 'राम जोशी' यांचा परिचय लिहा.

27. ''आम्ही भुकी पोरे, सैरावैरा धावू'' – संदर्भासहित स्पष्टीकरण करा.

**VI. खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा : 1 × 3 = 3**

28. (अ) देव तारी त्याला कोण मारी.

**किंवा**

(ब) एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ.

**VII. खालील प्रश्नांची उत्तरे पाच सहा वाक्यात लिहा :** **10 × 3 = 30**

29. लेखकाच्या घरी काकूंचे आगमन कसे झाले ?

30. चाफ्याच्या झाडाला लेखक 'बड़ी माँ' का म्हणतात ? त्याची गंमत कोणती ?

31. शिबिर घेण्यासाठी येणारे शिक्षक नाखूष का असत ?

32. लेखकाबरोबर भांडण झाल्यावर आई काय म्हणे ?

33. बेळगाव काँग्रेसमधील घटनांचे वर्णन करा.

34. हवा असलेला शकुन सांगण्यासाठी संत ज्ञानेश्वर कावळ्याला कोणत्या गोष्टी देऊ करतात ?

35. पाहुणे कसे निगरगट्ट आहेत ते सांगा.

36. पृथ्वी – सूर्य, चंद्र – पृथ्वी यांचा संवाद तुमच्या शब्दात लिहा.

37. हिरव्या तृणपात्याचा सत्कार का व कसा करण्यात आला ?

38. 'धरण' कवितेतील स्त्रीच्या गरीब परिस्थितीचे वर्णन कसे केले आहे.

**VIII. खालील प्रश्नांची उत्तरे आठ–दहा वाक्यात लिहा :** **4 × 4 = 16**

39. विद्येबद्दल डॉ० आंबेडकर काय म्हणतात ?

40. पतीच्या मृत्युनंतर टिटवं घेऊन जाताना सावित्रीबाईंना कोणकोणत्या गोष्टी आठवत होत्या ?

**किंवा**

सावित्रीबाईं शिक्षिका म्हणून शाळेत जाऊ लागल्यावर लोकांनी कोणत्या प्रतिक्रिया दर्शविल्या ?

41. 'गाऊ त्यांना आरती' कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

**किंवा**

कवीने कृष्ण, कर्ण, सौभद्र, मार्कंडेय यांचे दाखले का दिलेले आहेत स्पष्ट करा.

42. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा

या भारतात बंधुभाव ........................

...............................................

..................... ख्रिश्चन वा हो इस्लामी.

**किंवा**

स्वातंत्र्य सुखा या ............................

...............................................

................................ एक हो आम्ही.

**IX. खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :**

**1 × 4 = 4**

43. राष्ट्रीय चारित्र्य हा त्या राष्ट्रातील लोकांच्या दर्जाचा कणा आहे. हे राष्ट्रीय चारित्र्य जितके विशुद्ध व उच्च दर्जाचे असेल तितका त्या लोकांचा विकास प्रतिकूलतेवर मात करूनही होईल. भारतातील लोकांना जेव्हा या प्रतिकूलतेचा अर्थ प्रथम

[ Turn over

ध्यानी येईल तेव्हा त्यावर मात करण्याचा ते डोळे उघडे ठेवून प्रयत्न करतील. जय किंवा पराजय ही अगदी वेगळी बाब आहे. एखादेवेळी अपयश पत्करावे लागले तरी जे लोक खऱ्या अर्थाने प्रभावित झालेले आहेत व ज्यांच्याजवळ उच्च राष्ट्रीय चारित्र्याची कणखर बैठक आहे ते अडचणींना बिचकत नाहीत.

**प्रश्न** :

(अ) लोकांचा विकास केव्हा होईल ? 2

(ब) कोणते लोक अडचणींना बिचकत नाहीत ? 2

**X. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा : 1 × 5 = 5**

44. तुमच्या परिसरातील कचऱ्याचे ढीग हलविण्यासाठी ग्राम पंचायतीला विनंती अर्ज करा.

**किंवा**

तुमच्या मित्राला वाढदिवसाला येण्यासाठी आमंत्रण देणारे पत्र लिहा.

**XI. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा :**

**1 × 5 = 5**

45. (अ) पर्यावरण प्रदूषण एक समस्या

(ब) वाटणी-एक शाप.

DO NOT WRITE ANYTHING HERE